************

**Reaccredited By NAAC with 'A + +' Grade**

# Syllabus

# भजन प्रमाणपत्र अभ्यासकम

## सहामाही कोर्स

## संगीत व नाटयशास्त्र विभाग

आंर्तविद्याशाखा **(Interdiciplinary studies )**

**अभ्यासकम 2021 पासून पुढे लागू**

1. **अभ्यासक्रमाचे शिर्षक – ‘ भजन प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

2. आंर्तविद्याशाखा **(Interdiciplinary studies )**

3 **अंमलबजावणी वर्ष** – 2021 – 2022

4. **प्रस्तावना** – भजन किंवा भजन परंपरा ही भक्तीसंगीताशी संबधीत परंपरा आहे.

महाराष्ट्राची भूमी ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. सर्वसामान्यांचे आराध्य दैवत हे पंढरपूरचा विठोबा असल्याने हया विठोबाला संतानी रचलेल्या अभंगामध्ये मध्यवर्ती स्थान आहे. सकल संतानी अभंगाबरोबरच गौळण, भरूड याही काव्यप्रकारांच्या रचना केल्या आहेत. आषाढी व कार्तीकी एकादशीला 'वारी' च्या माध्यमातून आपल्या आराध्य दैवताच्या म्हणजे पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनाला जाणा–या वारकरी संप्रदायामध्ये 'भजन' या कलाप्रकाराला मानाचे स्थान आहे. पखवाज टाळ,एकतारी, यावादयांच्या साथीने 'भजन' सादर करण्याची परंपरा महाराष्ट्रामध्ये आहे. भजनाच्या प्रकारामध्ये शास्त्रीय संगीताच्या आधारे संताच्या रचना सादर करण्याचे एक माध्यम म्हणजे संगीत भजनशिवाजी विदयापीठाच्या संगीत व नाटयशास्त्र विभागाच्या वतीने संगीत भजन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या कोल्हापूर आणि कोल्हापूरच्या परीसरातील इच्छुकांना तंत्रशुध्द संगीत भजन शिकण्याच्या शिकण्याच्यादृष्टीने लाभ होईल.

5. **अभ्यासक्रमाचे उद्देश** –

1. भजन कलेचे तंत्रशुध्द शिक्षण देणे
2. भजन कलेतील बुजुर्ग कलाकारांच्या ज्ञानाचा लाभ करून घेणे व या कलांचे संवर्धन करणे.
3. भजन कलेचा प्रसार व प्रचार करणे
4. भजन तयार करणे व त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

6. **अभ्यासक्रमाचा कालावधी** – 6 महिने

7. **आकृतीबंध** – सहामाही अभ्यासक्रम (120 तास)

8. **अभ्यासक्रम फी** – 2500/–

9. **पात्रता** – 1) लिहीता वाचता येणे व मराठी बोलता येणे आवश्यक

2) भजन कलेची आवड

**10. माध्यम** – मराठी

**11. अभ्यासक्रम संरचना –**

1) सदर अभ्यासक्रम हा 120 तासांचा असेल.
2) या अभ्यासक्रमासाठी केवळ प्रात्याक्षिक असेल.
3) अभ्यासक्रमाच्या शेवटी प्रात्यक्षिक परीक्षा घेवून यशस्वी विदयार्थ्यांना विदयापीठामार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल.

**12. एकूण तास** – 120 (प्रात्यक्षिक)

13. **इतर वैशिष्ठे –**

1) प्रवेशक्षमता –15 विदयार्थी
2) ढोलकी,हार्मोनियम,डफ,खंजीरी, दिमडी, तुणतुण, झांज,इत्यादी आवश्यक वादये.

**14. मार्गदर्शक तत्वे –**

1) या अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यांची हजेरी किमान 75 % असणे आवश्यक
2) अनुभवी शिक्षक / व्यावसायिक कलाकारांचे मार्गदर्शन/साथीदार उपलब्ध करून दिले जातील.
3) भजन विषयासंदर्भात प्रात्यक्षिकसह तज्ञ कलाकारांच्या प्रात्याक्षिकासह कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

**Workload- 120 lectures** **Intake– 15**

## संगीत भजन प्रमाणपत्र अभ्यासकम ( 6 महिने )

**अभ्यासकम**

1) भजन सांप्रदायाचा इतिहास व भजनाचे प्रकार याबद्दल माहिती

2) सादरीकरणाच्या पद्धती –

3) साथीची वाद्ये व माहीती –

4) भजन सादरीकरणातील घटक – 1) गजर 2) रूपाचा अभंग 3) नामाचा अभंग 4) गौवळण 5) भारूड इत्यादी.

5) शास्त्रीय संगीतातील काही आवश्यक रागांची ओळख व स्वरूपाची तयारी

6) भजनासाठी आवश्यक तालांची माहीती व अभ्यास.

7) भजनाच्या साथीची वाद्ये = पखावज, तबला, ढोलकी, हार्मोनिअम, 5 टाळ, तानपुरा मशीन